|| हरी ॐ ||

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ओम् सद्गुरु प्रतिष्ठान आणि प्रकाश ज्ञान शक्ती केंद्र आयोजित वार्षिक यज्ञसोहळा श्री क्षेत्र पुष्कर, अजमेर राजस्थान येथे घेण्यात आला. परमपूज्य श्री सद्गुरु बापट गुरुजींसोबत ३०० जणांच्या भक्त परिवाराला पुष्कर येथे जाऊन तप करण्याचे सौभाग्य लाभले. या सर्वांची उत्तम निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था माहेश्वरी सेवा सदन, पुष्कर येथे करण्यात आली. तसेच माहेश्वरी सेवा सदनाच्या मध्यवर्ती प्रांगणात यज्ञशाळा उभारण्यात आली होती.

दि. १५ ते २१ डिसेंबर २००९ या सात दिवसांच्या यज्ञ सोहळ्यात यज्ञ प्रज्वलन व वैश्विक शक्तींना आवाहन, त्यानंतर दैनिक यज्ञ, मानसपुजा, श्री सद्गुरुंचे विवेचन, भोजन, मंत्रपठण व हवन, नामस्मरण असा दिनक्रम होता. या वर्षीच्या यज्ञसाधनेला जोड होती, ती वैज्ञानिक निष्कर्षांचा आधार घेत केलेल्या ध्यानयोग रहस्यावरील विवेचनांची.

या सात दिवसांतील कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा असा, -

दि.१५ डिसेंबर रोजी मंगळवारच्या यज्ञाची सुरुवात श्री गणेश यज्ञाने झाली. सद्गुरुंनी सकाळच्या विवेचनात श्री पुष्कर क्षेत्राची ओळख व महात्म्य कथन केले. ते म्हणतात, पद्मपुराण व महाभारतात पुष्कर क्षेत्राचा उल्लेख, सप्त क्षेत्रांपैकी एक महत्त्वाचे क्षेत्र असा, केलेला आढळतो. पद्मपुराणात श्लोकबद्ध रचना अशी आहे की,

दुष्करं पुष्करं गंतुम् । दुष्करं पुष्करे तपः ।
दुष्करं पुष्करे दानम् । वस्तुं चैव सुदुष्करं ।
त्रिणी शृंगाणी शुभ्राणी । त्रिणी प्रस्त्रवणांच ।
पुष्कराण्याधी सिद्धानी न विद्मस्तत्र कारणं ।

याचा अर्थ पुष्करला जाणे कठीण, जाणे झाले तर तप घडणे कठीण, तप घडले तर दान घडणे त्याहीपेक्षा दुष्कर, दान घडले तर रहायला मिळणे कठीण. तिन्ही पापांचे नाशक आणि दैदिप्यमान क्षेत्र असा पुष्करचा उल्लेख आहे. त्याचबरोबर सद्गुरुंनी मेंदूशास्त्रातील वैज्ञानिक प्रयोगांच्या निकषांनुसार तसेच अध्यात्मशास्त्राच्या सिद्धांतांनुसार ध्यान म्हणजे काय व मानवी जीवनातील त्याची आवश्यकता, यावर विवेचन केले.

दि.१६ डिसेंबरच्या बुधवारची सुरुवात श्री रामरक्षा यज्ञाने झाली. सकाळी श्री सद्गुरुंनी 'ध्यान कोणी करावे?, आणि पात्रता काय असावी?, यावर विवेचन केले. ते म्हणाले, 'कोणतीही व्यक्ती ध्यान करू शकते. त्यासाठी कुशाग्र बुद्धीची आवश्यकता नाही. याला प्राथमिक अटी फक्त तीनचः- १) तो विहित कर्तव्य पूर्ण करणारा असावा. २) संयमी असावा ३) गुरुभक्त असावा.' या दुसऱ्या पाठात श्री सद्गुरुंनी, योगशास्त्राची

अष्टांग साधना व अद्वैत मतप्रणालीला अभिप्रेत असलेले अष्टांग साधन यांच्या आधारे, ध्यान कसे करावे तसेच कुंडलिनी योग यांवर विस्तृत विवेचन केले.

संध्याकाळच्या विवेचनात श्री सद्गुरुंनी, मानवी स्वभावास अनुसरुन ध्यानप्रक्रियेत येणाऱ्या दोन प्रकारच्या अडथळ्यांचा उल्लेख केला. १) बाह्य अडथळे- यात स्थळ शांत नसणे याचा समावेश होतो. २) आंतर अडथळे - मुळात ध्यानयोग ही आंतर्यात्रा असल्याने या आंतर अडथळ्याचं माध्यम मन आहे. हे मन ध्यानामध्ये कशा प्रकारची विघ्ने, व का उपस्थित करते, यावर विवेचन करुन, त्यावर उपायदेखील सुचविले.

दि.१७ डिसेंबरच्या गुरुवारची सुरुवात श्री दत्त यज्ञाने झाली. हा दिवस सर्व शक्तीमान अशा ईश्वरी शक्तीपुढे नतमस्तक होण्यासाठी कुठल्याही जातीभेदाचा अडसर येत नाही याची प्रचिती देणारा ठरला. याचे कारण म्हणजे परमपूज्य सद्गुरु श्री बापट गुरुजींसोबत अजमेरच्या ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्याला दिलेली भेट. यामध्ये कुराणातील सद्गुरु सुफी 'दशरथदादाका कादरी (ससाणे महाराज) शत्तारी सिलसिला' आणि 'पीर-ए-दरिकत बाबा शरीफ उल हसन चिश्ती कादरी अब्दुल ईल्लाही जहागिरी नाक्षबल्ली (शफीक उल हसन खान बाबा)' या सत्पुषांचा सहभाग होता. समाजाची सेवा, जीव ब्रह्म सेवा व्रत असे ज्याला म्हणतात ते व्रत घेतलेले हे सत्पुरुष होत. यांनी दर्ग्यामध्ये दर्शनासाठी सर्व भक्तांची उत्तम व्यवस्था केली होती. दर्ग्यामध्ये सद्गुरुंबरोबर सर्व भक्तांनी चादर चढवली. त्यानंतर सद्गुरु सुफींनी तेथे कुराणातील काही कलमा म्हटल्या व सर्वांसाठी 'दुआ' मागितली.

गुरुवारची संध्याकाळची आरती ही या दोन्ही महंतांच्या हस्ते झाली. त्यानंतर त्यांचा सत्कार श्री सद्गुरुंच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना श्री सद्गुरु म्हणाले, "ईश्वर आणि ब्रह्मतत्त्व हे एकच आहेत. जिथे जिथे सामुहिक प्रार्थना म्हटली जाते तिथे तिथे शक्तीची निर्मिती होत असते. त्या शक्तीपुढे विनम्र होऊनच गेले पाहिजे तरच ती ग्रहण करता येते. तिथे कुठलाही भेदाभेद मनातही असता कामा नये. अद्वैताचे धागे जुळती भक्तीच्या सागरी, हेच केवळ सत्य असून जिथे हे द्वैताचे सर्व धागे गळून पडतात तिथे मानवता हा एकच धर्म उरतो."

यानंतर शफीक उल हसन खान बाबा यांनी यज्ञदेवतेसमोर एक सुफी भजन सादर केले.

दि.१८ डिसेंबर रोजी शुक्रवारची सुरुवात श्री शतचंडी स्वाहाकाराने झाली. यादिवशी यजमानांच्या हस्ते नऊ कुमारीका व एक बटु यांचे पुजन करण्यात आले. यानंतर श्री नंदे गुरुजी आणि त्यांचे सहकारी यांचा सद्गुरुंच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सकाळच्या विवेचनात श्री सद्‌गुरुंनी ध्यानास सहाय्यक ठरणाऱ्या बाबींवर विवेचन करताना १) एकाग्रता,२) सत्कर्म पथ्य, ३) अपयश ४) श्रद्धा ५) संकल्प ६) प्रार्थना यावर भाष्य केले. ध्यानयोग रहस्यावरील ही प्राथमिक विवेचने पूर्ण झाल्यावर श्री सद्‌गुरुंनी येथून पुढे क्रमशः स्थूल ते सूक्ष्म असे ध्यानयोगाचे प्रकार समजावून दिले व प्रार्थनेसहित प्रत्येक प्रकारावर प्रात्यक्षिके घेतली.

संध्याकाळच्या विवेचनात प्रतीकोपासनेविषयी सांगताना ते म्हणाले की, एकाग्रतेसाठी प्रतीकोपासनेचे दोन प्रकार आहेत. १) अध्यात्माधिष्ठीत प्रतीके आणि
२) विज्ञानाधिष्ठीत प्रतीके.

दि.१९ डिसेंबर शनिवारची सुरुवात विष्णुयज्ञाने झाली. सकाळच्या विवेचनात श्री सद्‌गुरुंनी ध्वनीवरील ध्यानप्रकार समजावून देतांना शब्द, वाक्य आणि नाद यावरील एकाग्रतेची महती सांगितली. ते म्हणाले, "ध्वनीपासून गती आणि गतीपासून ध्वनी निर्माण होतो आणि त्या ध्वनीला योग्य असा आकार, उकार आणि मकार दिला तर ती शक्ती निश्चित उपयोगी पडते.

प्रकाशावरील ध्यानप्रकार समजावून देताना, श्री सद्‌गुरुंनी, संध्याकाळच्या विवेचनात यज्ञाची महती कथन केली व ते म्हणाले की, "प्राचीन वेद वाङमयांनी यज्ञाचा गौरव केला आहे. चांगल्या हेतूने प्रज्वलित केलेल्या अग्नीमध्ये उत्तमोत्तम हविर्द्रव्य अर्पण करून उत्तमोत्तम संदेश निश्चित जागी पोहचवण्याचे काम यज्ञाचा प्रकाश करतो. विज्ञानाच्या दृष्टिकोनातून EPR Paradoxचा सिद्धांत आणि प्रख्यात मेंदू शास्त्रज्ञ Gray Walter चा रंगांचा सिद्धांत त्यांनी समजावून दिला. त्यानुसार प्रकाशावर केलेली एकाग्रता व त्याला दिलेली हविर्द्रव्याची जोड यामुळे व्यक्तिमत्त्वात असलेली कमतरता भरून निघते.

विवेचनानंतर श्री. व सौ. नाखरे यांनी उपस्थित सर्व भक्तांतर्फे श्री सद्‌गुरुंची पाद्यपुजा व आरती केली. नंतर सद्‌गुरुंनी सर्वांना दर्शनाचा लाभ दिला.

दि. २० डिसेंबर रविवारची सुरुवात गायत्री यज्ञाने झाली. सकाळच्या विवेचानत श्री सद्‌गुरुंनी श्वासगतीवर एकाग्रता आणि प्राणायाम व त्याचे प्रकार याविषयी सांगितले. संध्याकाळच्या विवेचनात श्री सद्‌गुरुंनी विश्वमनावर एकाग्रतेविषयी सांगताना ज्ञानेश्वरांचे पसायदान, रुद्राध्याय आणि भगवतगीतेमध्ये विश्वमनाची संकल्पना कशी मांडली आहे व त्याबरोबरच आधुनिक मानसशास्त्रातील दिग्गजांचे, सामुहिक मनाबाबतचे वैज्ञानिक निष्कर्षही त्याला पोषक कसे आहेत ते समजावून सांगितले.

दि.२१ डिसेंबर सोमवारची सुरुवात ही रुद्रस्वाहाकाराने झाली. याच दिवशी पुष्कर येथील महादेव घाटावर पितृयज्ञ घेण्यात आला. उपस्थित सर्व भक्तांतर्फे सौ. व श्री.सुहास ठाकुर यांनी पुष्कर तिर्थाची पुजा केली. त्यानंतर श्री सद्‌गुरुंनी पितरांसाठी श्लोक म्हणून त्याचा अर्थ कथन केला. उपस्थित सर्व भक्तांनी पितरांना हविर्भाग अर्पण केला. त्यानंतर श्री सद्‌गुरुंनी स्वतः महादेव घाटातील पुष्कर तीर्थामध्ये सर्व पितरांसाठी तर्पण विधी करून हविर्द्रव्य अर्पण केले. अशाप्रकारे पितृयज्ञाची सांगता करून सर्वांनी पुष्कर परिक्रमेसाठी प्रस्थान केले. यात श्री विष्णु मंदीराचे दर्शन घेतल्यानंतर वेदपाठशाळेला भेट देण्यात आली. तिथे शिकणाऱ्या मुलांनी श्री सद्‌गुरुंचे आणि सर्व भक्तांचे सरस्वती स्तवन म्हणून स्वागत केले आणि गायन प्रस्तुत केले. तिथे वेदपाठशाळेतर्फे श्री सद्‌गुरुंचा सन्मान करण्यात आला. नंतर श्री ब्रह्मामंदीराचे दर्शन घेऊन परिक्रमा पूर्ण करण्यात आली.

संध्याकाळी सात दिवसांच्या यज्ञात भक्तांना आलेले अनुभव कथन करण्यात आले. यामध्ये वेदपाठशाळेतील श्री. नंदे गुरुजींनी आपल्या अनुभव कथनात सांगितले की, 'यज्ञासाठी ह्या धर्मशाळेची निवड झाल्यानंतर परवानगी मिळण्यासाठी साधारण एक ते दीड महिन्याचा कालावधी लागतो पण यावेळी मात्र ही सर्व कामे अवघ्या एका तासातच झाली. याचाच अर्थ असा की सद्‌गुरुतत्त्व हे देश काल भेदांच्या पलिकडे कार्यरत असते. त्यांनी सर्व भक्तगणांच्या शिस्तप्रियतेबद्दल गौरवोद्गार काढले.

संध्याकाळच्या विवेचनात श्री सद्‌गुरुंनी निर्गुणाचे ध्यान याविषयी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'ही सर्वात उच्च व शेवटची पायरी आहे. स्वस्वरुपानुसंधानम् - स्वतःचे स्वरुप (चैतन्यशक्ती - आत्मा) म्हणजेच स्वतःचे आत्मतत्त्व व सद्‌गुरुतत्त्व एकरूप झाल्यावर जे स्वरूप तयार होतं, त्याची  केलेली भक्ती ती सर्व श्रेष्ठ भक्ती होय. अशी भक्ती आपल्याला करता आली पाहिजे.'

सरतेशेवटी पूर्णाहुती व आशिर्वाद मंत्रांनी यज्ञसोहळ्याची सांगता झाली.

श्री. नंदे गुरुजींनी भक्तांच्या ज्या अनुशासनाचा उल्लेख केला त्यात सिहांचा वाटा आहे तो श्री सद्‌गुरुंच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या आपल्या प्रशासनाचा व स्वयंसेवकांचा. मुंबई - अजमेर ते पुष्कर प्रवासात गाडीत भक्तांना त्यांच्या सामानासकट सुरक्षित ने - आण, रात्रीचा प्रवास असल्याने आळीपाळीने रात्रभर गाडीत दिलेला पहारा, प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे केलेली निवासाची सोय,भोजन व्यवस्थेमध्ये दरदिवशी वेगळे आणि चविष्ट पदार्थ देण्यापासून ते रोग प्रतिकारक गोळ्या, काढा व Alcohol based handwash देणे, यज्ञविषयानुरुप दररोज सुबक रांगोळ्या काढणे, यज्ञशाळा व निवासाची अहोरात्र कडक सुरक्षा व्यवस्था, पुष्कर परिक्रमा व महादेव घाटावर

पितृयज्ञाच्यावेळी एका रांगेत स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली केलेले मार्गक्रमण, तसेच भक्तांना केलेली हवी ती मदत, परतीच्या प्रवासात सामान उतरवण्यापासून ते त्या त्या स्थानांवर पोचवणे आणि भक्तांना बस, टॅक्सी, यामध्ये बसवून ते सर्व घरी सुखरूप परतल्याची खात्री करणारे फोन, या सर्व गोष्टींची आवर्जून दखल घ्यायला हवी. शिस्तनियमांना मिळालेली सहकार्याची जोड, ही, असे मोठे कार्यक्रम लीलया पार पडण्यासाठी उपयोगी पडू शकते, हे यातून सिद्ध होते.

जप, तप, हवन, आणि श्री सद्गुरुंचे विवेचन या प्रामुख्याने चार गोष्टींनी ओतप्रोत भरलेला हा यज्ञसोहळा होता. भारतीय अध्यात्म आणि यज्ञ यांची विज्ञानाबरोबर सांगड घालून अनेक क्लिष्ट गोष्टींची उकल सद्गुरुंनी अगदी सोप्या पद्धतीने करून दिली. या सर्वांचे सतत मनन, चिंतन केल्याने आपल्या सर्वांची आध्यात्मिक आणि वैयक्तिक उन्नत्ती झाल्याशिवाय राहाणार नाही. सात दिवसांच्या तप साधनेनंतर मिळालेला अविस्मरणीय आनंद, उत्साह आणि शक्ती ही प्रत्येकाने अनुभवावी अशीच आहे, म्हणूनच चिरकाल टिकणाऱ्या यज्ञाच्या ज्योतीला वंदन करुया आणि त्यामार्फत उत्तमोत्तम संदेश देऊन उत्तम वातावरणनिर्मिती करण्यासाठी कटिबद्ध होऊया.

।। हरि ॐ ।।